जिल्हा व सत्र न्यायालय, सातारा.
सेशन पोलीस प्रॉसिक्युशन स्क्वॉड, सातारा.
(साक्षीदार अभ्यागत कक्ष)

प्रेस नोट दिनांक - ३०/१०/२०२६

स्वत:च्या मुलाचा गळा आवळुन खुन करणा-या आरोपीस (वडील) यांना भा.द.वि.स.क ३०२ खाली जन्मठेप व ३,०००/- रुपये दंड, दंड न भरलेस ०६ महिने साधी कैद, भा.द.वि.स.क २०१ खाली ७ वर्षे सक्तमजुरी व ५००/-रुपये दंड , दंड न भरलेस १५ दिवस साधी कैद

वाठार- आरोपी नामे विजय आनंदराव खताळ वय ३५ वर्षे धंदा शेती रा.हिवरे ता.कोरेगांव जि.सातारा याने मला कॅन्सर झाला असुन मी मरणार आहे व माझा मुलगा विक्रम ऊर्फ प्रणव विजय खताळ वय १२ वर्षे रा.हिवरे ता.कोरेगांव जि.सातारा यास हा खुप गरीब स्वभावाचा असून माझ्या मृत्युनंतर माझ्या मुलाचे खुप हाल होतील म्हणुन मी मरण्या अगोदर प्रणव यास मुक्ती देण्यासाठी मी दि.२३/१२/२०२३ रोजी १६.०० ते २०.०० वा.चे सुमारास गोठयातील गाईला बांधण्याचे दोरीने माझ्या मुलगा विक्रम ऊर्फ प्रणव विजय खताळ वय १२ वर्षे याचा गळा आवळुन त्याचा खुन करुन त्याचे प्रेत आमचेच ऊसाच्या शेतात टाकुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. म्हणून वगैरे मजकुरची फिर्यादी वरुन वाठार पोलीस स्टेशनला गुन्हा रजि.दाखल करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाचा तपास **तत्कालीन तपासी अधिकारी श्री. एस बी भोसले सहा. पोलीस निरीक्षक वाठार पोलीस ठाणे** यांनी करुन सदर गुन्हयाचे दोषारोप पत्र मा.न्यायालयात पाठवण्यात आले होते.

सदरचा खटला **मा. श्री.एस.आर.तांबोळी, जिल्हा व सत्र न्यायाधीश (DJ २) सो सातारा** यांचे कोर्टात चालला होता. **सरकारतर्फे श्री एम कुलकर्णी जिल्हा सरकारी अभियोक्ता, सातारा व तत्कालिन श्रीमती लकडे जिल्हा सरकारी अभियोक्ता, सातारा** यांनी खटल्याचे कामकाज पाहिले. नमुद केसमध्ये एकुण **१५ साक्षीदार** तपासले. परिस्थितीजन्य पुरावा तसेच अन्य साक्षीदारांचे साक्षीवरून व जिल्हा सरकारी वकील यांचा युक्तीवाद व आरोपीने केलेल्या कृत्याबाबत मा.उच्च न्यायालय,सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे यांचे दाखले न्यायालयात सादर केलेने समोर आलेला पुरावा ग्राहय मानुन मा.न्यायाधीश सो **श्री.एस.आर.तांबोळी, जिल्हा व सत्र न्यायाधीश (DJ २) सो सातारा** यांनी आज **दि.३०/१०/२०२६ रोजी यातील आरोपी यास भा.द.वि.स.क ३०२ खाली जन्मठेप व ३,०००/- रुपये दंड, दंड न भरलेस ०६ महिने साधी कैद, भा.द.वि.स.क २०१ खाली ७ वर्षे सक्तमजुरी व ५००/-रुपये दंड , दंड न भरलेस १५ दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावण्यात आली आहे.**

मा. श्री. निखील पिंगळे पोलीस अधीक्षक सातारा, मा. डॉ. वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सातारा, श्रीमती राजश्री तेरणी उपविभागीय पोलीस अधिकारी कोरेगाव विभाग कोरेगाव व श्री. सुशील भोसले सहाय्यक पोलीस निरीक्षक वाठार पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली पैरवी अधिकारी म्हणुन प्रकाश मेळावणे पो.कॉ ब.नं.१०७१ वाठार पोलीस स्टेशन यांनी कामकाज पाहिले.

पोलीस अधीक्षक सातारा करीता.